क्रमांक : १८५९६ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ६ डिसेंबर, २०२१

**:: परिपत्रक ::**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे सुधारित विवरणपत्र**

**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६८७२/ई-१, दि.३ नोव्हेंबर, २०२१**

**या सचिवालयाचे संदर्भाधीन परिपत्रकामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.**

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२१ चे विधान भवन नागपूर येथे होणारे पूर्वनियोजित तृतीय (हिवाळी) अधिवेशन मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ ऐवजी बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार आहे. त्यानुसार बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या अधिवेशन कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तराबाबतची माहिती दर्शविणारे सुधारीत विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून या सचिवालयाच्या mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**(१) मा.मंत्री यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नेमून देण्यात आलेला दिनांक.**

**(२) महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्नांची उत्तरे QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने या सचिवालयाने ठरवून दिलेल्या मुदतीत पाठविण्यात यावीत.**

**(३) तारांकित प्रश्नांची उत्तरे या सचिवालयास मिळण्याच्या अंतिम दिनांकापर्यंतच संपूर्ण ऑनलाईन पध्दतीद्वारे पाठविण्यात यावीत. सदर उत्तराची जबाबदारी ही संबंधीत विभागाची असल्यामुळे एकदा ऑनलाईन उत्तर दिल्यानंतर सदर उत्तर हे अंतिम उत्तर असे ग्राह्य धरण्यात येईल.**

**(धनश्री जगताप)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(४)सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित

# महाराष्ट्र विधानपरिषद
## तृतीय (हिवाळी) अधिवेशन, २०२१

**तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक तसेच विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे सुधारित विवरणपत्र**

| गट क्र.<br>(१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री<br>(२) | उत्तराचा पूर्वीचा वार व दिनांक<br>(३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक<br>(४) | विभागाकडून उत्तर येण्याचा सुधारित वार व दिनांक<br>(५) |
|---|---|---|---|---|
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | बुधवार, दि.०८ डिसेंबर, २०२१ | बुधवार, दि.२२ डिसेंबर, २०२१ | बुधवार, दि.१५ डिसेंबर, २०२१ |
| चार | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | गुरुवार, दि.०९ डिसेंबर, २०२१ | गुरुवार, दि.२३ डिसेंबर, २०२१ | गुरुवार, दि.१६ डिसेंबर, २०२१ |
| पाच | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | शुक्रवार, दि.१० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, दि.२४ डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, दि.१७ डिसेंबर, २०२१ |
| एक | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(८) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार मंत्री | सोमवार, दि.१३ डिसेंबर, २०२१ | सोमवार, दि.२७ डिसेंबर, २०२१ | सोमवार, दि.२० डिसेंबर, २०२१ |
| दोन | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) ऊर्जा मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) सहकार, पणन मंत्री<br>(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | मंगळवार, दि.०७ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, दि.२८ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, दि.२१ डिसेंबर, २०२१ |